येरळा प्रोजेक्टस् सोसायटी

Curiocity express & experience

YPS

# क्युरिओसिटी एक्सप्रेस

माहे : मे - जून २०११ | मासिक पत्रिका | पृष्ठ क्र. १

# येरळावाणी विशेष अंक 91.2 FM

Yerala Vani

या अंकात...
- स्कुल ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन (स्कोप)
- असे कां ?
- येरळावाणी अपेक्षा व जाबादारी
- येरळावाणीचे योगदान

## स्कुल ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन (स्कोप) चा १०० % निकाल !



येरळा प्रोजेक्टस् सोसायटी - जालीहाळच्या स्कुल ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन (स्कोप) चा १०० % निकाल !

जालीहाळच्या भागातील सर्व मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे व सज्जन, सुसंस्कृत तरुण वर्ग तयार करावा यासाठी स्कोप कायम प्रयत्नशिल आहे.

आठवीमध्ये प्रवेश घेतल्यापासून मुलांवर संस्कार सुरु होतात. प्रवेशाच्या पहिल्याच आठवड्यात वेलकम ॲक्टिव्हीटीज घेतल्या जातात. नवीन मुले ९वी व १० वीतील विद्यार्थ्यांबरोबर व शिक्षकांबरोबर टिम करून विविध खेळ खेळतात, कार्यक्रमात भाग घेतात त्यामुळे मुलांचे मोठ्या शाळेत गेल्याचे टेन्शन पहिल्याच आठवड्यात संपते. शिक्षकांबद्दलची भिती पुर्णपणे जाते आणि येथुन खरे शिक्षण चालु होते. पहिल्याच आठवड्यात शाळेचे संस्थापक श्री. नारायण देशपांडे विद्यार्थ्यांना शाळेचे मुल्य समजावून सांगतात. त्यांच्या मार्गदर्शनात परिक्षा व कॉपी हा महत्वाचा विषय असतो. ते सांगतात स्कोपमध्ये परिक्षा ही विद्यार्थ्यांची नसुन शिक्षकांची असते. शिक्षकांनी शिकवलेले विद्यार्थ्यांचा पेपर तपासल्यावर त्याला / तीला शिकवतात.

जर कॉपी केली तर प्रत्यक्ष ज्ञानाची कल्पना शिक्षकांना येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्याचे नुकसान होते हे पटवुन सांगितले जाते. त्यामुळे आठवीतील पहिल्या चाचणी परिक्षेपासून एस. एस. सी. च्या परिक्षेपर्यंत पुढेही ! विद्यार्थी कॉपी करत नाहीत हा संस्थेने अनुभव घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्याकडे असलेले प्रत्यक्ष ज्ञान परिक्षेतून व्यक्त होते. त्यामुळे स्कोपच्या १००% निकालाला विशेष महत्व आहे.

**चि. केशव गेणू भोसले हा ९२%** गुण मिळवून विद्यालयाचा प्रथम मानकरी ठरला. **द्वितीय कु. रेखा अशोक गगनमाले ९१.६४%, तृतीय कु. कोमल ज्ञानदेव जाधव ८६.३६%, चतुर्थ चि. अनिल गणपती बिराजदार ८४.९१%** गुण मिळवून उत्तीर्ण झाले. हे विशेष कौतूकाची बाब आहे. मुलांच्या या यशामागे शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक श्री. व्यंकटेश कुलकर्णी व शिक्षक श्री. अंगद मुंढे, श्री. डी. डी. जाधव, श्री. एस, एस, सावंत, सौ.सुजाता कांबळे यांचे विशेष प्रयत्न आहेत. तसेच श्री. पद्मनाभ केळकर यांचेही मोलाचे मार्गदर्शन आहे.

## असे कां ?

**प्रश्न - कम्युनिटी रेडीओ स्टेशन सुरु करण्यामागचा संस्थेचा हेतू कोणता ?**

उत्तर - येरळा प्रोजेक्टस् सोसायटी सांगली यांनी १९९८ साली जालीहाळ (बु.) या जत तालुक्यातील गावच्या परिसरातील ग्रामस्थांच्या विनंतीस मान देवून २२ गावांचे विकासाचे ध्येय हाती घेतले आहे. जालीहाळ हा प्रकल्प विभाग दूर्गम व दुष्काळी भाग आहे. दारिद्र व अशिक्षितता हे या भागातील लोकांचे महत्वाचे प्रश्न आहेत. त्यामुळे विकासाच्या प्रमुख प्रवाहापासून हे लोक लांब आहेत. त्या अनुसंघाने शिक्षण, शेती, आरोग्य, महिला विकास अशा अनेक विषयांवरील उद्‌बोधक व माहितीपूर्ण कार्यक्रम रेडीओच्या माध्यमातून साधता येईल. सरकारी योजना, सवलती व सेवा यांची योग्य ती माहीती या लोकांपर्यंत सहजपणे पोहोचवता येईल. संस्थेने हाती घेतलेले प्रकल्प व त्याची संपूर्ण माहीती सर्व लोकांपर्यंत पाहोचवण्याचे रेडीओ हे प्रभावी माध्यम ठरेल. अनेक महत्वपूर्ण विषयाला अनुसरुन जनजागृती करणे हे देखिल गरजेचे असते. यासाठी रेडीओचा मोठा सहभाग आहे. विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण अशा घडामोडी, देखिल जनसामान्यांपर्यत नेता येतील. अशी अनेक उद्दिष्टय डोळ्यासमोर ठेवून येरळा प्रोजेक्टस् सोसायटीने कम्युनिटी रेडीओ स्टेशन सुरु करण्याचे ठरवले. तब्बल दोन वर्षाच्या प्रयत्नानंतर रेडीओची परवानगी मिळवण्यात संस्था यशस्वी झाली.

संस्थेच्या सांगली येथिल हेडऑफिस मध्ये व जालीहाळ (बु.) येथिल कॅंपस् मध्ये सुसज्ज असे रेडीओ स्टुडिओ उभारण्यात आले आहेत. सांगली येथिल रेकॉर्डींग स्टुडिओद्वारे कार्यक्रम तयार करुन त्याचे जालीहाळ (बु.) येथिल स्टुडिओतून प्रसारण करण्यात येणार आहे.



यासाठी सांगली येथे अतिशय अनुभवी व कुशल अशी टीम कार्यरत असून जालीहाळ प्रकल्प परिसरातील लोकांच्या सहभागातून कार्यक्रम तयार करण्यात येत आहेत. या परिसरातील लोकांच्या उपजत कला-कौशल्य, पिढीजात असलेले ज्ञान यांचे या कार्यक्रमात सहभाग असेल. या लोकांनी स्वत:ला माहीत असलेले कोणत्याही विषयावरील ज्ञान, कौशल्य, शेती विषयक अनुभव, माहीती, तज्ञांकडून अपेक्षित असलेल्या माहीती संबंधीचे प्रश्न संस्थेकडे पाठवल्यास हा सहभाग वाढेल यात शंका नाही. तेव्हा असे हे लोकाभिमूख रेडीओ स्टेशन जुलै महिन्यामध्ये सुरु करण्यात आला आहे. आपल्या सर्वांच्या सदिच्छा व सहकार्याच्या मदतीनेच संस्था मार्गक्रमण करत आहे.

## ▸ येरळावाणी : अपेक्षा व जबाबदारी

### परसबाग प्रकल्प जालीहाळ बु ॥



१. एकाचवेळी परसबाग प्रकल्पात सहभागी असणाऱ्या लाभार्थ्यांना परसबाग प्रकल्पाविषयी विविध विषयावर माहिती देणे सोपे जाईल.

२. आहार तज्ञामार्फत लाभार्थ्यांना विविध पालेभाज्यांमधून मिळणारे पोषक घटकांविषयी माहिती एफ.एम. रेडिओ द्वार मिळू शकेल. (उदा. ठराविक दिवशी आहार तज्ञांशी फोनद्वारे सुसंवाद साधणे)

३. हंगामानुसार पिकणाऱ्या भाजीपाल्यांची माहिती तज्ञ मार्गदर्शकांमार्फत रेडिओद्वारे दिली जाऊ शकते.

४. विविध हंगामात भाजीपाल्यावर पडणाऱ्या रोगाविषयी माहिती व किडनियंत्रण तज्ञ मार्गदर्शकांमार्फत (शेती तज्ञ) मुलाखती चर्चेद्वारे एफ.एम. रेडिओचा उपयोग करता येऊ शकतो.

५. परसबागेमध्ये पिकलेल्या भाजीपाल्यांपासुन वेगवेगळ्या पाककृतींची माहिती आहार तज्ञांकडुन सर्वांना एकाचवेळी ऐकवता येणे शक्य होईल. तसेच लाभार्थ्यांच्याही पाककृतीची माहिती एफ. एम. रेडिओद्वारे इतर सर्व लाभार्थींना देता येते.

६. या भागात आढळणाऱ्या औषधी वनस्पती व त्यांचे विविध आजारांवरील उपयोग कशा पध्दतीने, किती प्रमाणात घ्यावे याची माहिती आयुर्वेदिक वनस्पती तज्ञांकडुन एफ. एम. रेडिओद्वारे सर्वांपर्यंत देणे शक्य होईल.

तसेच लाभार्थ्यांनाही आयुर्वेदिक वनस्पतीची माहिती असेल व ते त्याचे उपयोग कोणत्या आजारांवर करतात याचीही माहिती रेडिओद्वारे इतरांना ऐकवता येणे शक्य होईल.

७. विद्युत विरहीत फ्रिज : चेंबरची माहीती सर्व लाभार्थ्यांपर्यंत एफ.एम. रेडिओद्वारे पाहोचवता येईल.

– श्री. राहूल कांबळे

## सब सॉईल इरीगेशन

१. सब सॉइल इरिगेशन प्रकल्पात सहभागी असणाऱ्या सर्व लाभार्थ्यांना एकाचवेळी विशिष्ट फळबागांविषयी शेती (कृषी) तज्ञांमार्फत माहीती देता येते. (उदा. डाळींब) (ठराविक वार, वेळ ठरवून संपुर्ण फळबागांविषयी माहिती, उदा - त्या फळबागेचे लागण करण्यापासुन ते फळ येईपर्यंतची माहीती देणे तसेच.

२. पिकविलेल्या फळांचे (डाळींब, द्राक्ष, चिकु ,लिंबु) विक्री व्यवस्था विषयी संपुर्ण माहीती मार्केटिंग तज्ञाकडुन एफ. एम. रेडिओ द्वारे देता येऊ शकते.

३. फळबागावर येणाऱ्या रोगाविषयी तसेच किडनियंत्रणाविषयी माहिती शेती तज्ञाकडुन एफ. एम. रेडिओद्वारे देता येऊ शकते.

तसेच लाभार्थ्यांच्या समस्या प्रत्यक्ष मुलाखत चालु असताना फोनद्वारे विचारुन शंका सोडवू शकता येईल.

४. माती परीक्षण व पाणी परीक्षण या संस्थेमार्फत सब सॉईल इरिगेशन दिल्या जाणाऱ्या सुविधांची सविस्तर माहिती देणे शक्य होईल.



५. निर्धुर चुलीची माहीती सर्व लाभार्थींना एफ. एम. रेडिओ द्वारे ऐकवता येईल.

६. मायक्रोन्युट्रीशन्स - शेती तज्ञामार्फत याची संपुर्ण माहिती त्याचे महत्व सर्व लाभार्थ्यांपर्यंत एफ. एम. रेडिओमार्फत सांगता येईल.

८. डिफ्युजर तज्ञाविषयी मुलाखत - तज्ञ मार्गदर्शकाकडुन माहिती, सर्वांना एफ. एम. रेडिओ मार्फत मिळू शकते.

९. पाण्याची बचत डिफ्युजर तंत्राद्वारे

–श्री. दाशाळ बी. ए.

## धान्य बँक जालिहाळ

१. धान्य बँकेचे महत्व : ज्याप्रमाणे आर्थीक व्यवहार करणेसाठी बँक आहे त्याप्रमाणे धान्य बँकेची माहिती लोकांना समजावून सांगून त्याचे महत्व पटवून देणेसाठी तज्ञ शेती मार्गदर्शक सल्ला माहिती देता येईल.

२. जास्तीत जास्त धान्य साठा कसा ठेवता येईल यासाठी तज्ञ कृषी मार्गदर्शकाकडून माहिती पुरवणे सोपे जाईल.




३. धान्य गोडाऊनमध्ये धान्याचा साठा करण्याचे तज्ञाकडून मार्गदर्शक केले जावून योग्य वेळी योग्य किमतीमध्ये बाजारपेठ उपलब्धतेची माहिती पुरविणे सोपे जाईल.

४. निसर्गाच्या अवकृपेमुळे, होणाऱ्या धान्याची नासाडी होवू नये तसेच उपद्रवी प्राणी उंदीर, घूस यांच्यामार्फत होणारे धान्याचे नासाडी टाळणेसाठी योग्य ते मार्गदर्शन करणे सोपे जाईल.

५. निसर्गाच्या बदलानुसार कोणते पीक घेणे किफायतशीर आहे व त्याची काळजी कशी घेणे याबाबत कृषी तज्ञाकडुन योग्य मार्गदर्शन करुन देणे सोपे जाईल.

६. गरजू लाभार्थींना योग्य दरामध्ये धान्य उपलब्ध करुन देता येईल व त्याबाबतीत नियम व अटी गरजू लाभार्थींना कळविणे सोपे जाईल.

७. धान्य घेवून बाजारात जाणाऱ्या शेतकऱ्यांना बाजारातील धान्याचे दर चढ उतार याची माहिती त्यांना पुरविणे सोपे जाईल. व त्यांचे संभाव्य नुकसान टाळता येईल.

८. धान्य बँकेतून धान्य पुरवठा झालेस लाभार्थी यांची धान्य अडचण दूर होवून कर्ज काढून धान्य खरेदीची अडचण निर्माण होणार नाही व त्याची आर्थीक बचत होईल.

९. धान्य ठेव, देव व घेव या समन्वयाने लाभार्थी यांना धान्य साठविणेची सवय निर्माण होणेस मदत होईल.

-श्री. भारत नामदेव चव्हाण

### कूकूट पालन

कूकूट पालन प्रकल्प संदर्भात २२ गावांमध्ये उपक्रमाची माहिती एफ. एम. द्वारे लोकापर्यंत पाहोचविण्याचे प्रभावी माध्यम निर्माण होईल.

१. कूकूट पालन मिटींग / प्रशिक्षणाची माहिती सर्वांपर्यंत पाहोचवणे सहज शक्य होईल.

३. पशु वैद्यकिय डॉक्टर व कूकूटपालन धारकांच्या मार्गदर्शनानुसार शेती पुरक जोड व्यवसाय किफायतशीर कसा आहे याचे मार्गदर्शन करणे सोपे होईल.

४. कूकूट पालन व्यवसाय संदर्भात असलेल्या अडचणी याबद्दल तज्ञांच्या सल्ल्यानुसार मार्गदर्शन करणे सोपे जाईल.

५. कूकूट पालन पिलांची जोपासना याबद्दल पूर्व माहिती व लसीकरणबाबत मार्गदर्शन करणे सोपे जाईल.

६. पक्षांना लागणारा खुराक पक्षी ज्या गटात आहेत त्यानुसार कोणते खाद्य देणे व ते कसे तयार करणे त्यासाठी काय धान्य जरुरी आहे याचे मार्गदर्शन करणे सोपे जाईल.

७. हंगामानुसार संभाव्य आजार होवू नये यासाठी योग्य ती उपाय योजनेचे मार्गदर्शन करणे सोपे जाईल.

८. पक्षांचे असणारे रोग त्यांची लक्षणे उपाय व उपचार याबाबतीत मार्गदर्शन करणे सोपे जाईल.

९. शेतकऱ्यांना बाजार पेठ विषयी दराची चढ उतार याबाबत माहिती देणे सायीस्कर होईल.

१० कूकूट पालन व्यवसायापासून मिळणारे कोंबडी खत हे शेतीस फार उपयुक्त आहे व जमीनीची पत व धान्य उत्पादनात वाढ याबाबत कृषी तज्ञ व डॉक्टर यांच्या कडून मार्गदर्शन करणे सोपे जाईल.

-श्री. एम्. बी. अत्तार

### आरोग्य प्रकल्प

१. एफ. एम रेडीओ द्वारे महिला केंद्रित प्रतिबंधात्मक आरोग्य कार्यक्रम २२ गावांमध्ये चालू असून त्यामधील उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पाहोचवणे शक्य होईल.



२. आरोग्य प्रकल्पाच्या माध्यमातून भरवण्यात येणारी आरोग्य तपासणी शिबीरे, उपचार व छोट्या शस्त्रक्रीया, (कॅन्सर) गर्भाशय व स्तनाच्या कॅन्सर निदान पूर्व तपासणी, नेत्र तपासणी व शस्त्रक्रीया इ. ची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पाहोचवण्याचे प्रभावी माध्यम

३. वेगवेगळ्या लक्ष गटांची मिटींग / प्रशिक्षण / अभ्यास सहलीची माहिती (वेळेत) एकाचवेळी सर्वांपर्यंत पोहचवणेचे एकमेव माध्यम

४. तज्ञ डॉ. कडून वेगवेगळ्या आरोग्याच्या समस्यांवर मार्गदर्शन

५. भागातील लोकांच्या आरोग्य समस्यांचे प्रश्नउत्तराद्वारे तज्ञ डॉ. शंका निरसन, उपाय, इ.

६. प्रतिबंधात्मक उपायांवर लोकांच्यासाठी जनजागृती कार्यक्रम

७. आरोग्य विषयक लघु नाटक / गाणी / घोषवाक्य याद्वारे लोकांमध्ये जागृती निर्माण करणे सहजशक्य

८. स्वत:च्या कुटुंबामध्ये आरोग्य विषयक झालेले बदल, स्वत:ला आलेले अनुभव व्यक्त करण्याचे माध्यम

९. संस्थकडून आपातकालीन वेळी पुरवण्यात येणारी रूग्णवाहीकेच्या उपलब्धतेची माहीती २२ गावांतील लोकांपर्यंत वेळोवेळी पाहोचवणे.

१०. संस्थेमार्फत Bare foot म्हणून काम करणाऱ्या आरोग्य दूतांच्या मार्फत पुरवण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती लोकांपर्यंत पाहोचवणेची माध्यम.

-स्मिता पवार

### शेळी प्रकल्प जालिहाळ बु ॥

१. एकाच वेळी शेळी प्रकल्पाची जास्तीत जास्त लोकांपर्यंत माहिती पुरविणे सोपे जाईल.

२. जनावरांच्या तज्ञ डॉक्टरांकडुन शेळी पालनाविषयी योग्य जातीच्या शेळी जोपासना करण्यास किफायतशीर ठरु शकतील या संदर्भात एफ.एम. रेडीओद्वारे माहिती मिळू शकेल. व ठराविक दिवशी तज्ञ डॉक्टराशी फोनद्वारे सुसंवाद साधता येईल.

३. हंगामानुसार शेळी पालनाबाबत शेळ्यांना उद्‌भवणारे रोग, त्याचे लसीकरण करुन घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

४. विविध हंगामात येणाऱ्या रोगविषयी ठराविक होणाऱ्या रोगाच्या लक्षणाचे मार्गदर्शन करुन उपाय सुचविणे एफ.एम. रेडीओद्वारे सोपे जाईल.

५. शेळी पालनच्या लाभार्थीला शेळी विषयक होणारे आजार त्या आजाराचे लक्षणे त्यावरील घरगुती औषधे एफ.एम. रेडीओ मार्गदर्शन करण्यात येईल.

६. शेळ्यांच्या दुधाचे महत्व औषध म्हणुन कोणते खाद्य व पाणी किती प्रमाणात देण्याविषयी मार्गदर्शन एफ.एम. रेडीओ करिता येईल.

७. हंगामानुसार शेळ्यांना कोणते खाद्य व पाणी किती प्रमाणात देण्याविषयी मार्गदर्शन एफ.एम. रेडीओ करिता येईल.

८. लहान पिलाचे व गाभण शेळीचे संगोपन कशा पध्दतीने करायचे यांचे मार्गदर्शन तज्ञ डॉक्टराकडून एकाच वेळी सर्व लाभार्थींना एफ.एम. रेडीओ वरुन देणे शक्य आहे.

९. शेळी चारा प्लॉट विषयी माहिती शेती तज्ञ डॉक्टराकडून एफ.एम. रेडीओ माहिती पुरविता येईल.

१०. शेळी खरेदी करताना कोणती काळजी घ्यायची आहे ते तज्ञ डॉक्टराकडून एफ.एम. रेडीओ माहिती पुरविता येईल.

११. इन्शुरन्सचे महत्व तज्ञ पशुवैद्यकीय डॉक्टर



यांना बोलावुन लाभार्थींना व शेतकऱ्यांना महत्व पटवुन एफ.एम. रेडीओ एकाच वेळी २२ गावात मार्गदर्शन करिता येईल.

-संभाजी लक्ष्मण भोसले

### शैक्षणिक विभाग

लहान मुलांच्या आवडीची गाणी, गोष्टी ऐकवणे तसेच वेगवेगळ्या प्राणी-पक्षांचे आवाज ऐकवणे शक्य होईल. पालकांना उपलब्ध गोष्टींच्या पुस्तकांमधिल गोष्टी मुलांना कशा सांगाव्यात या बद्दल मार्गदर्शन एफ.एम द्वारे शक्य होईल याचबरोबर अशिक्षित आई-वडील आपल्या मुलाला एखादी गोष्ट सांगितली असेल तर हे सेशन



रेकॉर्डकरुन लावता येईल.

या प्रकल्पातील सहभागी पालकांच्या मुलाखती लावाव्यात. त्यांच्या मुलांच्या प्रतिक्रीया देखिल रेकॉर्ड करता येतील. यामुळे प्रकल्पात सहभागी नसलेल्या इतर अनेक पालकांपर्यंत रेडिओच्या माध्यमातून पोहोचता येइल.

-देवदास झेंडे

### क्युरिओसिटी सेंटर :-

१. ग्रामस्थ, मुल, शिक्षक व इतर सर्वांना वैज्ञानिक दृष्टीकोन देण्याचे एक प्रभावी साधन म्हणून एफ. एम. कडे पाहिले जाईल.

२. अंधश्रध्दा संबंधी शास्त्रीय सामाजिक कारण व यावरील चर्चा रेडिओवर लावावी.

३. विद्यार्थ्यांच्या कुतूहलपूर्ण प्रश्नांची चर्चा व उत्तरे या माध्यमातून देता येतील.

४. टाकावू वस्तूंचा शास्त्रीय उपयोग करुन उपकरणे तयार करण्याचे प्रात्यक्षिक रेडिओद्वारे देता येईल.

५. स्त्री - पुरुष समानतेवरील जिंगल्स तयार करुन लावता येतील.

६. ग्रामीण जिवनावर परिणाम घडवणाऱ्या विविध गोष्टींची चर्चा करता येईल.



७. अपारंपारिक ऊर्जा साधनांचे महत्व पटवून देता येणे शक्य होईल.

८. प्रदुषणाविषयी जनजागृती करणे योग्य होईल.

९. वैज्ञानिक प्रकल्पाची कृती सांगता येईल.

१०. क्युरिओसिटी या आगळ्या वेगळ्या आनंददायी सेंटरची माहिती देता येईल.

येथे भेट देणाऱ्या पालकांचे, विद्यार्थ्यांचे तसेच शाळांचे मनोगत घेता येईल.

११. स्पर्धा परिक्षांची माहिती मुलांपर्यंत पाहोचवता येईल.

१२. शाळांचे सांस्कृतिक कार्यक्रम रेकॉर्डकरुन प्रसारित करता येईल.

- हरिष डोळ

शैक्षणिक उपक्रमातील इतर अनेक गोष्टी जसे उसतोडीला जाणाऱ्या मुलांची हॉस्टेल, बालवाड्या या कार्यक्रमांची माहिती देता येईल. संस्थेच्या अनेक प्रशिक्षणांची माहिती लोकांपर्यंत पाहोचवता येईल.

शैक्षणिक दृष्टीने मुलांच्या प्रगतीसाठी अनेक कार्यक्रम करता येतील. ज्याद्वारे मुलांची शैक्षणिक रुची वाढीय लागेल तसेच पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून देण्यात येरळावाणीचा महत्वपूर्ण सहभाग होईल.

## येरळावाणीचे योगदान

### मंथन

माणूस हा समाजप्रिय आणि परिवर्तनशील आहे,असं बोललं जातं. आणि हे विधान खरंही आहे. मग तो माणूस गरिब असो वा श्रीमंत, शहरी भागात रहाणारा किंवा ग्रामीण भागात, सुशिक्षित असो किंवा निरक्षर .... तो नेहमीच कमी-अधिक प्रमाणात बदल स्विकारतो, वाईटाकडून चांगल्याकडे किंवा चांगल्याकडून अधिक चांगल्याकडे जाण्याचा ध्यास त्याला असतो. हे बदल, चांगल्याविषयीचं ज्ञान अर्थातच त्याच्या निरिक्षणशक्तीचं फलित म्हणावं लागेल. आपण जेव्हा आजूबाजूचा परिसर, सभोवतालची माणसं, निसर्गाचे विविध अविष्कार या साऱ्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतो... तेव्हाच खरी परिवर्तनाला सुरुवात झालेली असते... अगदी आपल्याही नकळत आपण इतरांमधील चांगलं टिपण्याचा प्रयत्न करत असतो, आणि आपोआपच आपल्यातील उणिवा गळून पडू लागतात... ही प्रगती नव्हे काय ...? हीच उद्याच्या क्रांतीची नांदी नव्हे काय ? ...अर्थात हे सगळं होण्यापूर्वी प्रश्न उभा रहातो तो म्हणजे... चांगलं काय ? खरं तर या



प्रश्नाचं उत्तर व्यक्ति, स्थळ, कालसापेक्ष आहे, त्यामुळेच ते ज्याने त्याने शोधाण्याचा प्रयत्न करण गरजेचं आहे. आपल्या गरजाही व्यक्ति, स्थळ, कालसापेक्ष असल्याने, म्हणजे प्रत्येकाची गरज वेगळी असल्यानेच एखाद्या गोष्टीकडे पहाण्याची प्रत्येकाची नजर वेगळी असते. एखाद्या गोष्टीची गरज आत्ता आपल्याला नसेल, पण म्हणून त्याचं महत्त्व कमी होत नाही. हे महत्त्व जाणून घेणं, ते अवलंबण, या प्रक्रियेदरम्यान आलेले अनुभव इतरांबरोबर वाटणं, इतरांच्या अनुभवात सहभागी होणं... हीच तर एक कला आहे... हेच तर आपण समाजप्रिय असल्याचं लक्षण आहे. या साठीच माणसामाणसात संवाद होणं गरजेचं आहे... तो सुसंवाद असेल किंवा विसंवाद.... मनं मोकळी होणं, मतं मोकळी होणं गरजेचं, ज्येष्ठांनी ज्येष्ठत्वाचे आणि पारंपारिकतेचे धडे द्यावेत, तर लहानांनी त्यांच्या विचारांचा आदर करत असतानाच आधुनिक, नाविण्यपूर्ण असं समोर आणणं गरजेचं आहे. इथे पुन्हा शिक्षणाचा, राहणीमानाचा, जाती-धर्माचा अडसर नको. इथे शेती, आरोग्य, शिक्षण, महिला, युवक अशा कोणत्याही क्षेत्राच्या मर्यादा नकोत....इथे हवी आहे. विचारांची देवाण घेवाण .... एखाद्या विषयावर

काथ्याकुट मतांचं आदानप्रदान जुन्या-नव्यातलं, चांगल्या-वाईटांचं, तुमच्या-आमच्यातलं... मंथन.... हो ! मित्र हो.. हाच विचार घेऊन ९१.२ एफ. एम. येरळावाणी तुमच्या भेटीला लवकरच येत आहे. आठवड्याच्या प्रत्येक मंगळवारी आणि गुरुवारी मंथन हा कार्यक्रम आपल्यासाठी सादर होणार आहे. आमच्याकडची माहिती तुम्हाला दिली जावी, तुमचं ज्ञान, तुमचे अनुभव आम्हाला मिळावे यासाठी मंथन हे हक्काचं व्यासपीठ. इथे जाती-धर्माचं, लिंग, वय, व्यवसाय कशाचंही बंधन नाही बरं का ! शाळेत जाणारा विद्यार्थी ते शिक्षक, अंगणवाडी सेविका, आरोग्यसेविका, ग्रामसेवक ते अगदी मोठ्या पदावरचे अधिकारी, महिला, पुरुष.. असं कोणीही या कार्यक्रमात सहभागी होऊ शकतं. तुम्ही आपल्या जालिहाळ परिसरात राहून काही विशेष काम करत असाल किंवा विशेष काम करत नसतानाही तुम्हाला तुमचे विचार तुमचे अनुभव आम्हाला सांगायचे असतील... तरिही तुम्ही या कार्यक्रमात सहभागी होऊ शकता ...तेव्हा तयार व्हा... आपल्या या परिसराच्या विकासाचा ध्यास घेऊन काम करणारी येरळा प्रोजेक्ट सोसायटी आता येरळावाणीच्या माध्यमातून पुन्हा तुमच्यापर्यन्त पाहोचत आहे... नव्या माहितीची, नव्या ज्ञानाची पारंपारिकतेशी सांगड घालू या.. मंथन च्या माध्यमातून तुमच्या - आमच्यात एक नवं नांत साधु या !

**-हर्षा बागल**
**मंथन – कार्यक्रम निर्माती**

## आरोग्यसंपदा

मनुष्याची वाटचाल पारंपारिकतेकडून आधुनिकतेकडे होत आहे. मात्र या धावपळीत... या धकाधकीत आपले स्वास्थ्य कुठेतरी हरवत-चालले आहे. केवळ शारिरिक नव्हे तर मानसिक अस्थैर्य निर्माण झाले असून दिवसेंदिवस बळावत जाणारे विविध प्रकारचे आजार... रोग हे याचेच लक्षण म्हणावे लागेल. खरं तर या निसर्गाने आपल्याला दोन्ही हातांनी संपदा दिली आहे. मात्र प्रगतीच्या नावाखाली याकडे आपण कानाडोळा करत आहोत, राहणीमान सुधारण्याच्या नादात दूषित अन्नपदार्थ, सेवन करणे, तब्येतीची हेळसांड करणे या गोष्टी घडत आहेत. याचाच परिणाम होऊन पुढे दुर्धर आजारांना बळी जावे लागत आहे. हे वेळीच रोखण्याची गरज आहे. त्यासाठी आरोग्याची व्याख्या ... त्याचा अर्थ जाणून घेण्याची गरज आहे. केवळ आजार किंवा अपंगत्व नसणे म्हणजे आरोग्य नव्हे, तर शारिरिक, मानसिक, आणि सामाजिक सुस्थिती म्हणजे आरोग्य. यासाठी सकस आहार, नियमित व्यायाम, स्वच्छता, प्रसन्न व एकाग्र मन, श्रद्धा, मन:शांती इत्यादी गोष्टींची गरज आहे. अर्थात या गोष्टींच्या अवलंबाने रोगमुक्त आयुष्याची खात्री देता येत नसली तरिही आजाराचे निदान लवकर होणे, वेळेवर योग्य उपचार करणेही आवश्यक आहे. यासाठी डॉक्टरी सल्ल्यापूर्वी घेता येण्यासारखे प्रथमोपचार, उपलब्ध औषधी वनस्पतींचा वापर, नियमित आहारात आवश्यक घटक, त्यांची उपयुक्तता या सगळ्यावर वारंवार विचार होण्याची गरज आहे. ही गरज लक्षात घेऊनच येरळा प्रोजेक्ट सोसायटी ९१.२ एफ. एम. येरळावाणीच्या माध्यमातून आरोग्यसंपदा कार्यक्रम दररोज तुमच्यासाठी घेऊन येणार आहे. वनौषधी, तृणधान्य, कडधान्य, भाजीपाला फळे यांची उपयोगिता. सूर्य माती- पाणी आदी तत्वाचे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व तज्ञ डॉक्टरांचा सल्ला आदीवर आधारित या कार्यक्रमात तुम्हीही तुमच्या आरोग्यविषयक समस्या आम्हाला विचारु शकता... त्या प्रश्नांची अचूक उत्तरे तुम्हाला याच कार्यक्रमातून मिळतील. तेव्हा येरळावाणी ९१.२ एफ. एम. ऐका आणि स्वस्थ रहा ....!

**-हर्षा बागल**
**आरोग्य संपदा कार्यक्रम निर्माती**

## येरळा एक्स्प्रेस

आपलं आयुष्य सुखी व्हावं यासाठी माणसाचा सारखा प्रयत्न सुरु असतो. पैसा कमावण्यासाठी माणूस कष्ट करतो. सगळ्या सुखसोयी मिळणं अनेक गोष्टींवर अवलंबून असतं. जशी हाताची सगळी बोटं सारखी नसतात तसंच देशातले जिल्हे, तालुके, गांव, खेडी एकसारखी नसतात तसंच देशातले जिल्हे, तालूके, गावं, खेडी एकसारखी नसतात. कुठं निसर्ग उदारहस्तानं पाऊस पाणी, उत्तम हवा देतो तर कुठं पाऊस लहरी असतो, फार कमी पडतो. एखादा प्रदेश सोयी सुधारणांपासून दूर रहातो. ३०-३५ वर्षापूर्वी जालिहाळ आणि आसपासच्या २२गावांचा प्रदेश दुष्काळाशी झुंज देत होता.

अशावेळी दुष्काळाच्या संकटानं ग्रस्त झालेल्या या परिसरातल्या नागरिकांना येरळा प्रोजेक्टस् सोसायटीनं मदतीचा हात दिला. १९७२ साली संस्थेचं कार्य सुरु झालं आणि १९७६ मधे येरळा प्रोजेक्टस् सोसायटी या संस्थेची अधिकृतपणे नोंदणी झाली.

संस्थेची स्थापना, कार्याची सुरुवात, कार्यातले वेगवेगळे टप्पे, कार्याच स्वरुप आणि एकेक प्रकल्प हाती घेत सुरु असलेली संस्थेची वाटचाल याविषयी सविस्तर माहिती देणारा येरळा एक्स्पप्रेस हा कार्यक्रम येरळावाणी ९१.२ एफ.एम. वर रोज प्रसारीत होणार आहे.

या कार्यक्रमात संस्थेचे विविध उपक्रमं, संस्थेचं कार्य, उपक्रमांची अंमलबजावणी याविषयी संस्थेतल्या अधिकाऱ्यांच्या, कर्मचाऱ्यांच्या मुलाखतींमधून माहिती ऐकायला मिळणार आहे.

विकास म्हणजे शहरी भागातल्या संस्कृती जीवनशैलीचं अनुकरण नव्हे तर आपलं गाव, आपली संस्कृती, आपले विचार, टिकवून स्वाभिमानानं जीवन जगणं आणि प्रगतीची वाट चालणं.

येरळा एक्स्प्रेस कार्यक्रमातून संस्थेच्या कार्याबरोबरच आपल्या भागाच्या प्रगतीची गती माहिती मिळेलच, त्यामुळं आपली वाटचाल पुढे चालूच रहाणार आहे आता आपल्या बरोबर आहे ९१.२ एफ.एम. येरळावाणी.

**निर्माती – नीता जोशी**

## कृषि जगत

शेतात हात राबतात मातीतून मोती फुलतात, श्रमदेवीला पूजतात डोलती पिकं शिवारात

उन्हाळा, हिवाळा, पावसाळा, वर्षाचे सहाही ऋतूमध्ये शेतकरी बांधव शेतात कष्ट करतात. उन्ह, वारा, पाऊस असूदे की कडाक्याची थंडी, शेतकऱ्याला कंटाळा नसतो. शेतकरी शेतामध्ये कष्ट करुन पिक फुलवतात. सगळ्यांसाठी अन्नधान्य पिकवतात.

अन्न ही माणसाची सगळ्यात महत्वाची मूलभूत गरज आहे. म्हणून शेती हा पाया आहे. शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. गावोगावी हवामान, पाऊसपाण्यानुसार शेतकरी शेती करत असतात.

जालिहाळ बु ॥ आणि आजूबाजूच्या २२ गावांचा आपल्या परिसर. आपल्या भागातल्या जमिनींचे प्रकार, हवामान, आणि उपलब्ध पाणी या



सगळ्यांचा विचार करुन आपल्या भागात कशा पध्दतीनं शेती केली जाते, शेतकरी बंधू शेतात कोणकोणती पिकं घेतात, नविन काही प्रयोग करतात, या सगळ्या विषयीची माहिती येरळावाणी वरच्या कृषिजगत या कार्यक्रमामधून दिली जाणार आहे. आपल्या भागातल्या प्रगतीशील शेतकऱ्यांच्या मुलाखती ऐकता येतील.

तसंच बाहेरच्या जगात शेतीमधे शेतकरी काही नवीन प्रयोग करतायत का ? शेतीक्षेत्रातल्या नवनव्या संशोधनातून पुढं येणारं आधुनिक तंत्रज्ञान, या विषयी शेतीतज्ञांच्या मुलाखती ऐकता येतील आपल्याला पडणाऱ्या शेतीविषयक प्रश्नांची उत्तरं कृषितज्ञांकडून मिळणार आहेत. तर काही वेळा संवादरुपाने श्रोत्यापर्यंत कृषिविषयक माहिती येईल.

कधीतरी कृषिविषयक माहिती वेगळ्याच मनोरंजक स्वरुपात देणारा कार्यक्रम असेल आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे कृषिजगत कार्यक्रमात या सगळ्या कृषिविषयक माहितीबरोबर छान छान सुमधुर गाणीसुध्दा ऐकायला मिळणार आहेत.

दर सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि शनिवारी कृषिजगत हा कार्यक्रम प्रसारीत होणार आहे.

तर श्रोत्यांच्या भेटीसाठी येत आहे. रंजन, ज्ञान आणि माहितीची खाणी - येरळावाणी ९१.२ एफ.एम.

निर्माती - नीता जोशी

## आपली वसुंधरा

आजकाल सर्वजण पर्यावरणावर भरपूर बोलतात. ते बिघडलंय असं म्हणतात. त्याच्या बद्दल नवनवी माहिती देतात. पण आज खऱ्या अर्थानं निसर्ग आणि पर्यावरण खऱ्या अर्थानं समजून घेण्याची आवश्यकता आहे. पर्यावरणावर वेगवेगळ्या गोष्टींचा परिणाम, पर्यावरणातील गमतीजमती, हवा, पाणी, जमीन, जीवजंतू, निसर्गातील विविधता, प्रदूषण, ग्लोबल वॉर्मिंगमुळं निर्माण झालेला धोका पर्यावरणाबद्दलचे समज-गैरसमज असं जाणून घेतल्याशिवाय पर्यावरण या विषयाचं खरं स्वरुप आणि महत्व समजणारचं नाही.

आणि याहून महत्वाचा विषय म्हणजे माणसाचा निसर्गातील हस्तक्षेप ! त्यामुळंच पर्यावरण बिघडत असल्याचं बोललं जात. हा बिघाड नेमका का व कसा होतो ? याची माहितीही घेणं गरजेच आहे.

आणि त्यासाठीच ही गाथा आपल्या सर्वांसाठी आणि पर्यावरणारच्या रक्षणासाठी सुद्धा आपल्या येरळावाणी ९१.२ एफ.एम. वर आपली वसुंधरा या कार्यक्रमातून.

निर्माती - अश्विनी खाडिलकर

## विचारधन

एकमेका सहाय्य करु । जगण्याचा निर्धार करु । प्रगतीसाठी नित्य झगडती त्याचाही सन्मान करु ॥

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. या समाजात जगताना जगणे सोपे व्हावे, चांगले व्हावे यासाठी काही नियम घालून दिलेले असतात. दैनंदिन जीवन जगताना आपण कसं जगाव, वयानुसार एकमेकांशी कसं बोलाव, कसा व्यवहार करावा, याच शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण माणसाच्या आयुष्याला अर्थ आणि आकार येतो तो मूल्यानींच मूल्य शिक्षण हाच संस्कृतीचा गाभा आहे. या चांगल्या मुल्यांची जाणीव प्रत्येक माणसात रुजवणे हेच शिक्षणाच खर कार्य आहे. माणूस सुशिक्षीत असावा पण त्याच्याही पेक्षा तो सुसंस्कारीत असावा लागतो. हे शिक्षण म्हणजे नुसता अवती-भवती घडणाऱ्या घटनांचा, आधार होऊन गोष्टीरुपात काव्याद्वारे सांगीतले तर तो पटकन समजतो आणि ऐकावसा वाटतो थोडक्यात औषध सरळ न देता साखरेत घोळवून दिली तर खायला ही गोड आणि जे औषध घेणे जरुरी आहे ते पण माणूस आनंदाने घेतो. बोधकथा, ऐतिहासीक, पौराणीक कथा, सुविचार, संस्कार कथा या माध्यामातून चांगले विचार सगळ्यांना ऐकायला आवडतात कारण त्याच प्रयोजन तत्वबोध करण असल तरी रुप कथेच असतं एक बाजू मानवीमनाच वास्तवदर्शन तर दुसऱ्या बाजूनी थोडसं नाट्य, काव्य, भाषा सौंदर्य असते. बोधकथा आकारान लहान आणि त्याच्यातून एकादा विचार अतिशय घोटीव असतो त्यातूनच माणूस जीवनाकडे एका वेगळ्या दृष्टीने पहायला शिकतो. हेच काम विचारधन या कार्यक्रमातून देण्याचा प्रयत्न आहे. येरळा प्रोजेक्टस सोसायटीची ज्ञानरुपी विकासगंगा जालीहाळ आणि आसपासच्या २२ खेड्यातून अविरत वाहते आहे आणि विकास रुपी ज्ञान घरोघरी पाहोचविण्याचा प्रयत्न करते आहे. त्या गंगेतूनच या येरळावाणीचा उगम झालेला आहे. शब्दरुपी ज्ञानातून होईल तेवढा विकास साधण्याचा येरळावाणीचा हा प्रयत्न आहे. जालीहाळ परीसरातल्या लोकपरंपरांची मूल्य जपून संस्कार जपून नविन दिशा देण्याचा हा प्रयत्न म्हणजेच "विचारधन"

निर्माती - मनिषा गाडगीळ

प्रकाशक / संपादक :- सौ. अनुराधा कुंटे,
येरळा प्रोजेक्टस् सोसायटी, सांगली.
मुद्रक:सह्याद्री ऑफसेट सांगली/२३२१५७७

संपर्क :
**येरळा प्रोजेक्टस् सोसायटी,**
मिरज रोड, टाटा पेट्रोल पंप जवळ गेस्ट हाऊस,
विश्रामबाग सांगली.
फोन : (०२३३) २६७५९१८, २६७१३१८
फॅक्स : (०२३३) २६७०७२२
web site : www.yerala.org Email : yeralaproject@dataone.in

Book-Post

To,